# नागपूर शहरातील असंघटीत श्रमीकांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे : एक समाजशास्त्रीय अध्ययन

:: यु.जी.सी. मान्यताप्राप्त लघुशोध प्रबंध ::


**संशोधन कर्ता**

प्रा. शिला चहांदे

विभाग प्रमुख, पी.डब्ल्यु.एस.कॉलेज, नागपूर.


**पी. डब्ल्यु. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.**

**२०१२-१३**

# सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत लघु प्रबंधाची वास्तविक स्थिती लक्षात घेऊन संशोधन कर्त्याने या शोध प्रकल्पाला दोन भागांमध्ये विभाजित केले आहे. पहिल्या भागामध्ये संशोधन कर्त्यांने विश्लेषण व निर्वचनाच्या आधारावर सारांश स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच दुसऱ्या भागामध्ये या सारांशच्या आधारावर निष्कर्ष काढून आजच्या समाजातील श्रमिकांची स्थिती, भुमीका, व समस्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

आधूनिक औद्योगिक समाजामध्ये श्रमिकांची दयनीय स्थिती आहे. एकीकडे समाजाच्या विकास होतांना दिसतो तर दुसरीकडे महागाई वाढलेली असते ज्यामध्ये श्रमिक लोकांना आपले जिवन जगणे कठीन होत असते त्याकरिता त्याला रात्र दिवस काम काम करावे लागते.

अशिक्षित व गरीबीमुळे कोणत्याही प्रकारचे काम या असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांना करावे लागते. आज भारतात 50 ते 80% प्रमाणात श्रमिक असंघटीत क्षेत्रात काम करतात. पुरूषांपेक्षा स्त्रियांना मजुरी ही कमी मिळत असते. ग्रामीण क्षेत्रांमध्ये स्त्री व पुरूषांना काम मिळत नसल्यामुळे हे लोक शहराकडे कामानिमीत्य येतात. विदेशी कंपन्यानी भारतामध्ये आपले अस्तित्व निर्मान केले आहे. श्रमिकांना ह्या कंपन्या कमी पैसे देऊन जास्तीत जास्त नफा कमवितात.

प्रस्तुत अध्ययना करिता 70 श्रमिकांचा समावेश केलेला आहे. या अध्ययन क्षेत्रामध्ये 4 विभागाच्या आधारावर असंघठित श्रमिकांची सामाजिक, आर्थिक व अन्य स्थितीचे अध्ययन केलेले आहे. ते विभाग खालीलप्रमाणे आहेत.

1) उत्तरदात्यांची पार्श्वभुमी

2) पारिवारीक स्थिती आणि समस्या

1) अध्ययनाच्या प्रथम विभागामध्ये प्रामुख्याने उत्तरदात्याच्या संबंधित असलेली सर्वसामान्य माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या माहीतीच्या आधारावर संशोधन कर्त्याने उत्तरदात्यांचे आयु. जाति, धर्म, शिक्षण, वैवाहिक स्थिती, मुळ निवास स्था, शहरात वास्तव्य किती वर्षापासून कुटूंबाचे स्वरूप, मुलांची संख्या, मासिक उत्पन्न (मिळवून), इत्यादि विषयी ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

2) अध्ययणाच्या दुसऱ्या विभांगामध्ये संशोधनकर्त्याने उत्तरदात्यांची कौटूंबीक व आर्थिक स्थितीचे अध्ययन तसेच समस्यांविषयी माहीत मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. अध्ययनाच्या या विभागामध्ये आर्थिक व्यावसायिक स्थितीचे अध्ययन केले आहे.

श्रमिकांच्या श्रमाचे मुल्य कोणत्यापद्धतीने मिळते तसेच ते आपल्या कामामध्ये समाधानी आहेत की नाही त्यांनी जीवन विमा काढलाय काय? बचत करतात काय? कारखाण्यात श्रमिकांची संख्या, इत्यादि प्रश्न व समस्याविषयी माहीती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

# विभाग ( अ )

## उत्तरदात्यांची पार्श्वभूमी

अध्ययनाच्या पहिल्या विभागामध्ये असंघटीत क्षेत्रास काम करनाऱ्या श्रमिकांची पार्श्वभूमी माहीती करूण घेण्याकरिता सर्वसामान्य प्रश्न विचारल्या गेली.

प्रस्तुत अध्ययनामध्ये नागपूर शहरातील असंघटीत श्रमिकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा विषयी माहीती संकलित करण्यात आली. या अध्ययनाकरिता 70 उत्तरदात्यांची निवड करण्यात आली. सर्वाधिक उत्तरदाता 23 (26.14%) उत्तरदाता पुरूष आहेत. धर्माच्या आधारावर वर्गीकरण केले असात असे दिसून आले की, सर्वाधिक उत्तरदाता हे हिन्दू धर्माशी संबंधित आहेत. कुंटूंबाच्या स्वरूपाच्या आधारावर विभाजन केले असता असे दिसून आले की, 62 (88.58%) उत्तरदात्यांचे कुटूंब हे संयुक्त स्वरूपाचे आहे.

या माहितीवरून असे दिसून येते की, 56 (80%) उत्तरदात्यांचे विवाह झाले आहेत असेच मातृभाषाच्या आधारावर विभाजन केले असता 40 (57.14%) उत्तरदाते हे हिंन्दी भाषा बोलतात अर्थातच त्यांची मातृभाषा ही हिन्दी आहे. तसेच 30 (42.86%) उत्तरदात्यांची मातृभाषा ही मराठी आहे व ते मराठी भाषा बोलतात.

# विभाग ( ब )

# उत्तरदात्यांची कौटूंबीक स्थिती व समस्या

कौंटूंबीक स्थितीवरून असे दिसून येते की, कुंटूबामध्ये कर्ता व्यक्ति हा उत्तरदाता आहे. उत्तरदात्यांचे कुंटूब हे जास्तीत जास्त 3 सदस्य संख्या दर्शविते परंतु त्यांची स्थिती ही कनिष्ठ मध्यम आहे. या कुंटूबातील स्त्रियांची संख्या 26 (38.57%) आहे तर पुरूषांची संख्या 27 (38.57%) आहे. यावरून असे लक्षात येते की पुरूष व स्त्रियांची संख्या ही जवळपास सारख्या प्रमाणात आहे.

1) आर्थिक स्थिती व समस्या : आर्थिक स्थितीचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांची मिळकत ही 100 रूपये प्रतिदिवस आहे. या मिळकतीच्या आधारावर कुटूंबातीतल खर्च पूर्ण होतो तसेच इतर सदस्य हे हातभार लावतात. उत्तरदात्यांच्या कुटूंबामध्ये 2000 ते 2500 रूपये प्रतिमाहे खर्च होतात. या खर्चाच्या आधारावर ते आपल्या कुटंबाच्या गरजा पुर्ण करण्याचा प्रयत्न करतात. कर्ज घेणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण हे फार कमी आहे व ज्यांनी कर्ज घेतले आहे. ते कर्ज बँकेकडून घेतले आहे.

   जास्तीत जास्त उत्तरदाता 34 (48.57%) हे बी.पी.एल. धारक आहेत.

2) सामाजिक स्थिती व समस्या : संशोधनावरून असे दिसून येते की, समाजाच्या दृष्टिकोण उत्तरदात्यांविषयी साधारण आहे, उत्तरदाते हे सामाजिक कार्यात सहभागी होत असतात. त्याकरीता समाजातील लोक वस्तु व पैसा या दोन्ही स्वरूपातून मदत करित असतात. जास्तीत जास्त उत्तरदाते हे धार्मिक प्रवृत्तीचे असून त्यांचे तीर्थस्थान हे मंदिर आहे. तसेच उत्तरदात्यांचे महागाई अपघात, घटस्फोट, हुंडाबळी, अश्या काही समस्या दिसून आल्या.

3) शैक्षणिक स्थिती व समस्या : शिक्षणाच्या संदर्भात अध्ययन केले असता असे दिसून येते की, सर्वाधिक उत्तरदाते हे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले असल्याचे आढळून आले त्याचप्रमाणे उत्तरदात्यांच्या मुला-मुलींचे शिक्षण स्थितीचे अध्ययन केले असता. असे दिसून येते की, 30 (42.86%) उत्तरदात्यांची मुले हे प्राथमिक शिक्षण घेत आहेत. शिक्षणाचे माध्यम हे हिन्दी असून प्रत्येक कुटूंबातील तीन-चार मुल-मुली शिक्षण घेत आहेत. उत्तरदाता आपल्या मुलांचा खर्च हा हातमजूरीच्या आधारे पूर्ण करतो. 50 (71.43%) मुलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नाहीत शिवाय 43 (71.43) मुलांना शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध आहेत.

4) आरोग्यविषयक स्थिती व समस्या : प्राप्त झालेल्या तथ्यांच्या आधारे उत्तरदात्यांच्या आरोग्यावरती साधारण परिणाम झालेला आहे असे दिसून आले.

5) निवासाची स्थिती व समस्या : प्राप्त माहितीच्या आधारे जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे निवास हे कच्चा स्वरूपाचे आहे व त्यांच्या घरामध्ये पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था नाही.

## निष्कर्ष :

प्रस्तुत अध्ययनाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीच्याा आधारे असे लक्षात येते की, नागपूर शहरातील असंघटीत श्रमीकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे ही अतिशय हलाखीची असून त्यांना समाजामध्ये पाहिजे त्याप्रमाणात प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही.

आयुष्यभर आपले श्रम विकून भांडवलदार हे अधिका अधिक श्रीमंत होत आहेत. याचे कारण म्हणजे असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे भांडवलदार हे जास्त प्रमाणात शोषण करित असतात त्यांची शैक्षणिक स्थिती फारसी चांगली वाटते.

नागपूर शहरातील असंघटीत श्रमिकांच्या समाजिक व आर्थिक स्थितीची अध्ययन केले असतात श्रमिक म्हणून स्थानीय झालेत. त्यांची स्थिती कौटूंबीक स्थिती ही दयनीय असते.

कौटूंबीक जबाबदारी ही जास्तीत जास्त पुरूषांवर अवलंबुन असते त्यामुळे त्यांना आपल्या कुटूंबाच्या गरजा पूर्ण करण्यास अनेक परिस्थितीचा सामना करावा लागतो. त्यामुळेच हे श्रमिक आपल्या पत्नीलाही कजूरकाम करण्यास स्वीकृती देतात.

जास्तीत जास्त श्रमिकांचे कुंटूंब हे संयुक्त कुंटूंब आहे. त्यामुळे मुलांचे पालन पोषन, शाळा, कौंटूबिक जबाबदारी ह्या संगळ्या समस्यांचे निराकरण होत असते.

असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे कुंटूंब हे अशिक्षित आहे. परंतु त्यांना असे वाटते की, मुलांना शिक्षण दिले पाहीजे. परंतु त्यांची आर्थिक स्थिती फार दयनीय असल्यामुळे ते आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही.

जास्तीत जास्त श्रमिकांचे असे मत आहे की, स्त्री व पुरूष या दोघांचाही दर्जा समान आणि कुटूबामध्ये समान असायला पाहिजे, घरघूती कामामध्ये पूरूषांनी स्त्रियांना सहकार्य केले पाहिजे.

श्रमिकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, श्रमिकांना पाहिजे त्या प्रमाणात श्रमाचा मोबदला मिळत नाही त्यामुळे ते आजही मागासलेपणाचे दिन जीवन जगतात. कामाचे वेतन हे आठवड्यानंतर दिले जात असते. तसेच त्यांच्या कामाचे तास निश्चित केले जात नाही. अधिकतर श्रमिक हे आपल्या ठरावीक कामामध्ये समाधानी आहेत.

शिक्षण, आरोग्याकरिता दवाखाने, निवासाकरीता अनुदान, इत्यादिकरीता काही थोडक्यात श्रमिकांना केद्र सरकारने सुरू केलेल्या कल्यानकारी योजनांचा लाभ मिळाला आहे.

//

Officiating Principal
P.W.S. Arts & Commerce College
Kamptee Road Nagpur-26